# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ही व्याख्यानमाला मंगळवार (ता.५) ते गुरुवार (ता.७) या कालावधीत होईल. दुपारी ३ वाजता व्याख्यानमालेला सुरुवात होईल. पहिल्या दिवशी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल हे 'स्पर्धा परीक्षा आणि तरुण' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. प्रा.डॉ.व्ही.एम.कुंभार हे बँकींग क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. 'वित्तीय क्षेत्रातील करिअर संधी' या विषयावर डॉ.व्ही.व्ही.ताटके माहिती सांगतील. महापालिकेचे माजी आयुकत डॉ.मल्लीनाथ कलशेट्टी हे 'स्पर्धा परीक्षा तयारी आणि अनुभव' या बद्दल मार्गदर्शन करणार आहेत.

# पी.जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस कोर्सला प्रवेश घेण्याची संधी

उजळाईवाडी : शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए. अधिविभागामध्ये पी.जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस कोर्सची शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. पी.जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस कोर्स ला कोणत्याही विषयाचे पदवीधारक विद्यार्थी/नोकरदार/व्यावसाईक, गृहिणी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. कोर्सच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी एम.बी.ए अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्याशी संपर्क साधावा अथवा विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Admission २०२० या लिंकला भेट द्यावी. विद्याथ्रयानी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन एम.बी.ए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठ परिसर फिरण्यास खुला करण्याबाबत सहकार्याची भूमिका घ्यावी

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचे आवाहन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ परिसर नागरिकांना फिरण्यासाठी खुला करण्याच्या मागणीबाबत टोकाचा पवित्रा न घेता कोव्हिड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर शहर जिल्ह्यातील विविध घटकांनी, संस्था, संघटनांनी सामंजस्याची भूमिका घेऊन विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

विद्यापीठ नागरिकांच्या विविध मागण्यांबाबत नेहमीच सकारात्मक आहे. तथापि, विद्यापीठ अनुदान आयोगाचे निर्देश, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार विद्यापीठ



शिवाजी विद्यापीठातून...

कार्यवाही करते.

विविध घटकांनी प्रशासनाकडे विद्यापीठ परिसर खेळाडूंना व नागरिकांना सकाळी व सायंकाळी सत्रात सरावासाठी व फिरावयास खुला करण्याची मागणी केली. त्यानुसार विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी व खेळाडूंना विद्यापीठाची क्रीडांगणे कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीचा विचार करून व नियमावलीचे पालन करून खुली करण्यात आली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ५ नोव्हेंबर रोजीच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नागरिकांना फिरण्यासाठी विद्यापीठ परिसर खुला करण्याबाबतचा विषय अधिकार मंडळ व जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे कुलसचिवांनी निवेदनात म्हटले आहे.